आर.सी.एस. क्र. ५२/२०१३
*कमलाबाई वि शेषराव*

निशाणी क्र. २९

**वादीतर्फे सा.क्र.१ कमलाबाई यांची उलटतपासणी प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री मुळे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.**

११. वादग्रस्त शेतीचा सर्वे क्रमांक १४८ आहे. त्या जमिनीचे क्षेत्र ०.८८ आहे. माझ्या वडिलांकडे वडिलोपार्जित अशी कोणतीही मिळकत नव्हती. त्यांनी जमीन १९८४ व १९८८ मध्ये तपासे व गायके यांच्या कडून खरेदी केली होती. त्यावेळी मोबदला म्हणून किती रक्कम दिल्या गेली ते मी सांगू शकत नाही. विक्री वेळी मी लहान असल्यामुळे हजर नव्हते. त्यावेळी माझे वडील मजुरी करत. माझ्या भावांमध्ये शेषराव सगळ्यात मोठा भाऊ आहे. त्यावेळी शेषराव लहान होता. त्याचे वय १५ वर्ष असावे. हे म्हणणे खरे नाही की, शेषराव त्यावेळी सज्ञानी होता व मजुरी देखील करत होता. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखतावेळी मोबदला माझ्या वडिलांनी व शेषरावने निम्मा निम्मा अदा केला होता. माझे वडील कर्ता पुरुष म्हणून घरातील सर्वात मोठे होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील कर्ता पुरुष असल्यामुळे फक्त शेती त्यांच्या नावे खरेदी झाली. साक्षीदार स्वतःहून सांगते की ती शेती माझ्या वडिलांनीच खरेदी केली होती.

१२. रमेश माझा लहान भाऊ आहे. सध्या ती जमीन रमेश व शेषराव अर्धी अर्धी वाहतात.

१३. माझी आईने माझ्या हक्कात हक्क सोड लेख सन २०१३ मध्ये तयार करून दिला. त्यावेळी मी तिथेच हजर होते. त्यावेळी माझ्या आईचे वय ६० ते ६५

असावे. माझी आई माझ्याकडेच पिपळा येथे राहत होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईचे वय जास्त असल्याने, तिला काही समजत नसल्याने, मी खोटा हक्क सोड लेख तयार करून घेतला. हक्क सोड लेख माझ्या बहिणीने देखील केला आहे. माझ्या बहिणीने हक्क सोडलेख सन २०१३ मध्येच केला. माझी बहीण हयात आहे. हे म्हणणे खरे नाही की, बहिणीकडून केलेला हक्क सोडलेख मी खोटा तयार केला आहे.

१४. वादातील घर माझ्या वडिलांनी कधी खरेदी केली ते मी सांगू शकत नाही. त्या घरात सध्या शेषराव राहतात. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केला.

उलट तपास पूर्ण. फेर तपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

(एस.आर.भरड)

दिनांक १७/०२/२०२४

**दिवाणी न्यायाधिश क.स्तर**

सावनेर